सदर प्रकरणाशी संबंधीत भा.दं.वि. कलम ४२० अन्वयेचे नि.फौ.ख.क्र. ५७३/२००२ शासन वि. संजय अग्रवाल हे प्रकरण मा. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, वर्धा यांच्याकडे प्रलंबीत आहे. या प्रकरणातील तक्रारकर्ताला अनिवार्य असलेले मुळ दस्तऐवज हे नि.फौ.ख.क्र.५७३/२००२ मध्ये असल्यामुळे फिर्यादीचा या प्रकरणातील अर्ज नि.क्र.२०१ वरील दि. ०८.१२.२०२५ रोजीच्या आदेशाचे अनुशंगाने मा. मुख्य न्यायादंडाधिकारी, वर्धा यांच्याकडून मुळ दस्त मागविण्यात येणारे पत्र नि.क्र.२०८ अन्वये पाठविण्यात आले. त्याबाबत नि.क्र. २१० अन्वये प्रज्वल प्रभाकर थुल, कनिष्ठ लिपीक यांची सदर मुळ दस्त या प्रकरणात आणण्याकरीताची नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, मुळ दस्त आणि या प्रकरणातील प्रमाणित प्रतीच्या अनुशंगाने सरतपास खालीलप्रमाणे -

**फिर्यादीची शपथेवर सरतपासणी विधीज्ञ श्री. पी.बी. टावरी यांच्या मार्फत -**

माझे नाव - राजन चंद्रशेखर साल्पेकर वय-७५, व्यवसाय- सेवानिवृत्त रा. ह.मु. ठाणे. मी अभिलेखावर माझे पुराव्याचे प्रतीज्ञापत्र दाखल केले आहे. माझे प्रतीज्ञापत्र मला आता दाखविले, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. तो नि.क्र.९८ वर आहे.

मी सदर प्रकरणात यादी नि.क्र.१०२-अ प्रमाणे दस्त क्र.५ नुसार धनादेश क्र.६९५१८७ रक्कम रू.१,२८,१२,५००/- हा फिर्यादीला आरोपी क्र.२ तर्फे आरोपी क्र.१ ने आम्हाला दिला होता. सदर धनादेशाची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर धनादेशाची श्री. थुल यांनी आणलेली मुळप्रत (नि.क्र.४११) अभिलेखावरील दस्त क्र.५ वरील प्रमाणे प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र.२११** देण्यात येत आहे. सदर धनादेशाचा परती मेमो दस्त क्र.६ प्रमाणे दाखल केला असुन त्याची मुळप्रत (नि.क्र.४१२) ही या प्रकरणातील प्रमाणित प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र.२१२** देण्यात येत आहे. सदर धनादेशाच्या संबंधाने धनादेश जमा पावतीची प्रमाणित प्रत दस्त क्र.७ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. त्याची स्थळप्रत (नि.क्र.४१३) ही या प्रकरणातील प्रमाणित प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र.२१३** देण्यात येत आहे.

मी सदर प्रकरणात यादी नि.क्र.१०२-अ प्रमाणे दस्त क्र.८ नुसार धनादेश क्र.६९५१८६, रक्कम रू. २६,७५,१५,२७०/- हा फिर्यादीला आरोपी क्र.२ तर्फे आरोपी क्र.१ ने आम्हाला दिला होता. त्यावर आरोपी क्र.१ ची सही आहे. सदर धनादेशाची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर धनादेशाची श्री. थुल यांनी आणलेली मुळप्रत (नि.क्र.४१४) अभिलेखावरील दस्त क्र.८ वरील प्रमाणे प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि. क्र.२१४** देण्यात येत आहे. सदर धनादेशाचा परती मेमो दस्त क्र.९ प्रमाणे दाखल केला असुन त्याची मुळप्रत (नि.क्र.४१५) ही या प्रकरणातील प्रमाणित प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र.२१५** देण्यात येत आहे. सदर धनादेशाच्या संबंधाने धनादेश जमा पावतीची प्रमाणित प्रत दस्त क्र.१० अन्वये अभिलेखावर दाखल आहे. त्याची स्थळप्रत (नि.क्र.४१६) ही या प्रकरणातील प्रमाणित प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र. २१६** देण्यात येत आहे.

सदर प्रकरणामध्ये फिर्यादीने शासकीय प्रतिकृती घेण्याकरीता आरोपीला पैसे दिले होते. त्याबाबत आरोपी क्र.२ तर्फे आरोपी क्र.१ ने आम्हाला करार टिप्पणी (कॉन्ट्रॅक्ट नोट) दिली होती. त्याची मुळप्रत (नि.क्र.४१७) ही या प्रकरणातील प्रमाणित प्रतीशी पडताळुन बघितली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र. २१७** देण्यात येत आहे. सदर मुळ करार टिपणी पोलिसांनी माझेकडून जप्त केली होती. त्यावर जप्त करणारा म्हणुन माझी स्वाक्षरी आहे.

सदर प्रकरणात यादी नि.क्र.१०२-अ प्रमाणेचे इतर दस्त श्री. थुल यांनी आणलेल्या मुळ दस्तांशी पडताळुन बघितले व ते साक्षीदाराने सांगितल्याप्रमाणे तेच असल्यामुळे त्यांना खालीलप्रमाणे निशानी क्रमांक देण्यात आले आहेत -

| अनु.क्र. | मुळ निशानी क्रमांक | दस्तांचे स्वरूप | देण्यात आलेले निशानी क्रमांक |
|---|---|---|---|
| १२ | ४०५ | दि. २४.०२.२००१ रोजीचे ठरावाची प्रमाणित प्रत | **२१८** |
| १३ | ४०९ | आरोपी क्र.२ तर्फे दि. १६.०३. २००१ रोजी देण्यात आलेले पत्र. | **२१९** |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | ४१० | आरोपी क्र.२ तर्फे दि. ०८.०३. २००१ रोजी देण्यात आलेले पत्र. | **२२०** |
| १५ | ४०६ | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅंक तर्फे चिफ अकाउंटंट महा.स्टेट कॉ. बॅंक यांना दि. १६.०३.२००१ रोजी देण्यात आलेले पत्र. | **२२१** |
| १७ | ४०९ | आरोपी क्र.२ ने विविध व्यवहारा करीता दिलेले दि. २८.०३.२००१ रोजी चे पत्र. | **२२२** |
| १८ | ३९४ | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅंक तर्फे चिफ अकाउंटंट महा.स्टेट कॉ. बॅंक यांना दि. १६.०३.२००१ रोजी देण्यात आलेले फक्स. | **२२३** |
| १९ | ३९५ | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅंक तर्फे चिफ अकाउंटंट महा.स्टेट कॉ. बॅंक यांना दि. १६.०३.२००१ रोजी देण्यात आलेले फॅक्स. | **२२४** |
| २० | ४०७ | आरोपी क्र.२ ने आरोपी क्र.१ च्या सहीने वर्धा डी.सी.सी. कॉ. बॅंक यांना दि. २१.०३.२००१ रोजी दिलेले पत्र. | **२२५** |
| २१ | ३९६ | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅंक यांनी आरोपी क्र.२ चे संचालक केतन सेठ यांना दि. ३०.०३.२००१ रोजी दिलेले पत्र. | **२२६** |
| २२ | ३९७ | वर्धा डी.सी.सी. कॉ. बॅंक यांनी एम.एस.को.ऑ. बॅंक यांना दि. ३०.०३.२००१ रोजी देण्यात आलेले पत्र. | **२२७** |
| २० | ४०८ | आरोपी क्र.२ ने आरोपी क्र.१ च्या सहीने वर्धा डी.सी.सी. कॉ. बॅंक यांना दि. १९.०४.२००२ रोजी दिलेले पत्र. | **२२८** |
| २४ | ३९८ | वर्धा डी.सी.सी. कॉ. बॅंक यांनी आरोपी क्र.१ ला दि. ०२.०७.२००१ रोजी दिलेले पत्र. | **२२९** |
| २५ | ३९९ | वर्धा डी.सी.सी. कॉ. बॅंक यांनी एम.एस.को.ऑ. बॅंक दि. ०४.०९.२००१ रोजी दिलेले पत्र. | **२३०** |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | ४०० | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅक यांनी आरोपी क्र.२ ला दि. १७.०९. २००१ रोजी दिलेले पत्र. | **२३१** |
| २७ | ४०१ | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅक यांनी आरोपी क्र.२ ला दि. ०४.०१. २००२ रोजी दिलेले पत्र. | **२३२** |
| २८ | ४०३ | वर्धा डी.सी.सी. कॉ.बॅक यांनी आरोपी क्र.२ ला दि. १५.०३. २००२ रोजी दिलेले पत्र. | **२३३** |
| ०२ | ५१३ | फिर्यादीने आरोपीविरूध्द केलेली लेखी तक्रार माझे सहीने देण्यात आली. त्यातील मजकुर खरा आहे. | **२३४** |
| ०१ | -- | फिर्यादीने आरोपीविरूध्द केलेल्या लेखी तक्रारीवरून प्रथम खबरी अहवाल गुन्हा क्र.११०/२००२ नोंदविण्यात आला. त्याची छापील प्रत. | **२३५** |
| ०३ | ३९० | जप्ती पत्रक दि. २६.०४.२००२ | **२३६** |
| ०४ | ३९१ | जप्ती पत्रक दि. ०६.०५.२००२ | **२३७** |
| -- | -- | दि. २४.०४.२००२ रोजीची आरोपींना धनादेश रकमेची मागणी नोटीसची स्थळप्रत. | **२३८** |
| -- | -- | सदर नोटीस आरोपी क्र.१ व २ यांना पाठविल्याबाबत पोस्टाची मुळ पावती. | **२३९ व २४०** |
| १०२-ब/ ०३ | -- | आरोपी क्र.१ ला नि.क्र.२३८ ची पाठविलेली नोटीस परत आल्याबाबत लिफाफा. | **२४१** |
| १०२-ब/ ०३ | -- | नि.क्र.२४१ चा लिफाफा न्यायालयासमक्ष उघडण्यात आला. त्यातील नोटीसची प्रत साक्षीदारास दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर वकीलांची सही आहे. | **२४२** |
| १०२-ब/ ०४ | -- | आरोपी क्र.२ ला आरोपी क्र.१ मार्फत नि.क्र.२३८ ची नोटीस मिळाल्याबाबत मुळ पोच पावती. | **२४३** |
| नि.क्र. २४४ सोबत | -- | साक्षीदाराचे आधार ओळखपत्राची प्रमाणित प्रत. | **२४५** |

आरोपी क्र.२ च्या इतर संचालकांना देखील नोटीस पाठविण्यात आली होती. वर नमुद आरोपींच्या संबंधीत झालेले पत्र व्यवहार व इतर व्यवहाराबाबत दस्तातील मजकुर खरा व बरोबर आहे. नि.क्र.२३८ वरील नोटीस वर फिर्यादीचे अधिवक्ता श्री. ए.बी. चौधरी यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर फिर्यादी बॅकेच्या वतीने माझे सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरच्या धनादेशांची रक्कम आजपर्यंत बॅकेला प्राप्त झालेली नाही. सदर प्रकरणातील धनादेशांची रक्कम ही आमच्या सोबत झालेल्या व्यवहाराच्या शेवटच्या दिवसापर्यत आलेल्या व्याजाच्या रकमेला धरून देण्यात आलेली आहे. फिर्यादी बॅकेने शासकीय प्रतिकृती मध्ये जास्त व्याज मिळत होते व ते तिमाही आम्हाला मिळणार होते म्हणुन आम्ही इतकी मोठी रक्कम गुंतविली. सदर रक्कम मुदत ठेव स्वरूपात गुंतविल्यास त्यामध्ये व्याजदर कमी होते. बॅकेला जास्त नफा मिळवण्याचे दुष्टीकोणातुन सदरची रक्कम आरोपींमार्फत गुंतविण्यात आली होती.

सरतपास पुर्ण.

**प्रकरण साक्षदाराच्या उलट तपासासाठी.**

श्रवणोत्तर स्विकृत,

MANGALA GAJANAN HIVARALE

Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2025.12.18 17:57:52 +0530

(एम. आर. चव्हाण (हिवराळे))
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), वर्धा.

वर्धा.
दि. १८.१२.२०२५